महाराष्ट्र शासन
सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग
डॉ.बाबासाहेब आंबेडकर मागासवर्गीय मुलांचे शासकीय वसतीगृह, वसई

डिसोझा हॉस्पिटल जवळ, रमेदी, वसई (प), जि.पालघर-४०१२०१
दुरध्वनी : ०२५० २३०९१११ ई मेल: govtbcboyshostelvasai@gmail.com

जा.क्र./डॉ.बाआंमामुशाव/प्रवेश/२०२४-२५/96 दिनांक :- 23/07/2024

प्रति,
मा. प्राचार्य,
संत गोन्सालो गार्सिया महाविद्यालय.
वसई, जि. पालघर

विषय: आपल्या शैक्षणिक संस्थेतील विद्यार्थ्यांना डॉ.बाबासाहेब आंबेडकर मागासवर्गीय मुलांचे शासकीय वसतीगृह, वसई येथे प्रवेशाकरिता सूचित करणेबाबत.

संदर्भ: १. मा. आयुक्त समाज कल्याण यांचे परिपत्रक सकआ/शिक्षण/शावगृ/सन २४-२५ प्रवेश प्रक्रिया/ २०२४-२५/का-५अ/पुणे/२१९१ /दिनांक:०१.०७.२०२४

महोदय,

शासनाच्या सामाजिक न्याय विभागांतर्गत डॉ.बाबासाहेब आंबेडकर मागासवर्गीय मुलांचे शासकीय वसतीगृह, वसई हे वसतीगृह कार्यरत असून विद्यार्थ्यांना मोफत निवास, बेडिंग साहित्य, नाश्ता व भोजन, ग्रंथालय, संगणक सुविधा (इंटरनेटसह), मनोरंजनाकरिता दूरचित्रवाणी संच व क्रीडासाहित्य इत्यादी सुविधा पुरविण्यात येतात. त्याचप्रमाणे विद्यार्थ्यांना दरमहा रुपये ५००/-निर्वाह भत्ता तसेच शैक्षणिक सहित्य/प्रकल्प खर्च/गणवेश खर्च/शैक्षणिक सहल इत्यादींकरिता नियमानुसार देय रक्कम विद्यार्थ्यांच्या खात्यात जमा करण्यात येते.

उपरोक्त संदर्भ क्र. १ च्या परिपत्रका अन्वये सन २०२४-२५ च्या शैक्षणिक वर्षाकरिता शासकीय वसतीगृहांमध्ये प्रवेश प्रक्रिया सुरु करण्यात आली आहे. त्यानुसार शालेय विद्यार्थी (इयत्ता ८ वी पासून पुढे), कनिष्ठ महाविद्यालयीन विद्यार्थी (११ वि व १२ वी) व बिगर व्यावसायिक अभ्यासक्रम या विद्यार्थ्यांसाठी डॉ.बाबासाहेब आंबेडकर मागासवर्गीय मुलांचे शासकीय वसतीगृह, वसई या वसतीगृहातील रिक्त जागांवर गुणवत्तेनुसार व शासनाच्या नियमांनुसार प्रवेश प्रक्रिया सुरु करण्यात आली आहे.

सदर वसतीगृह वंचित घटकांच्या शैक्षणिक प्रगती व एकूण व्यक्तिमत्त्व विकासाकरिता कार्यरत आहे. तरी जास्तीत जास्त गरजू विद्यार्थ्यांना याचा लाभ मिळावा याकरिता आपण आपल्या संस्थेतील विद्यार्थांना वसतीगृह प्रवेशाबाबत सूचित करावे अशी आपणांस विनंती.

खालील पत्त्यावर प्रवेश अर्ज उपलब्ध करून देण्यात आले आहेत.

**डॉ. बाबासाहेब आंबेडकर मागासवर्गीय मुलांचे शासकीय वसतीगृह,**
**रॉयल पार्क सोसायटी समोर, रमेदी, वसई (पश्चिम),**
जि. पालघर, पिन कोड: ४०१२०१

आपला विश्वासू
(सही)
गृहपाल
डॉ.बाबासाहेब आंबेडकर मागासवर्गीय
मुलांचे शासकीय वसतीगृह, वसई

WARDEN
Dr.B.R Ambedkar Govt
BC Boys Hostel,Vasai